वासुदेव मेघश्याम निखार्गे वि.
अनंत पुंडलिक निखार्गे व.२४

## निशाणी क्रमांक ७८ वरील आदेश

१. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.१ यांचे वारसांना प्रतिवादी म्हणून सामील करून घेणेची परवानगी मागितलेली आहे.

२. वादीच्या मते, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.१ श्री. अनंत पुंडलिक निखार्गे हे दिनांक २२/०५/२०२१ रोजी गांव मौजे वेंगुर्ला, ता. वेंगुर्ला येथे मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र.१ यांना मयुरेश अनंत निखार्गे (मुलगा), श्री. हेमंत अनंत निखार्गे (मुलगा) व वेदा विशांत नायक पुर्वाश्रमीची चारुशिला अनंत निखार्गे हेच नजीकचे व कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे त्यांना प्रस्तुत दाव्याकामी प्रतिवादी म्हणून सामील करणेची परवानगी वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे केलेली आहे.

३. वादीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

४. प्रतिवादी क्र. १(अ) ते १(क) यांनी म्हणणे दाखल केलेले नाही, परंतु प्रतिवादीतर्फे विधिज्ञ यांनी युक्तीवाद करुन प्रस्तुत अर्जास आक्षेप घेतला आहे.

५. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले. सदरचा दावा वादीने प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतीचे व दावा इमल्याचे सरस निरस मानाने धडेवाटप होऊन पृथक कब्जा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ वादीने आपले प्रतिज्ञापत्र प्रस्तुत अर्जासोबत अभिलेखावर दाखल केलेले आहे. तसेच वादी यांनी नि.८३ सोबत प्रतिवादी क्र.१ अनंत पुंडलिक निखार्गे यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची छायांकित प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. दाव्याचा निकाल गुणदोषावर लागणेसाठी तसेच,

नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे मयत प्रतिवादी क्र.१ यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. त्यामुळे वादीचा सदरचा अर्ज मंजुर करणेस कोणतीच हरकत दिसून येत नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२. वादीने सरनाम्यामध्ये निशाणी क्र.७८ वरील अर्जाप्रमाणे दुरूस्ती करणेची परवानगी देण्यात येते.

३. वादी यांनी सदर आदेशाप्रमाणे दाव्यात दुरूस्ती करणेची आहे व दाव्याची दुरूस्त प्रत पुढील तारखेस वा तत्पूर्वी दाखल करावी

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

KUMBHAR RANJANA GOVIND

Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2026.02.27 18:06:18 +0530

दिनांक– २६/०२/२०२६

ठिकाण– सावंतवाडी

(श्रीमती आर.जी.कुंभार)
सह दिवाणी न्यायाधीश,(क.स्तर),
सावंतवाडी.